# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ५६) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.१७ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## सरकारने मराठ्यांचे कुणबीकरण थांबवावे; छगन भुजबळांची थेट मागणी

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- ज्यांकडे कुणबी नोंदी आहेत त्यांना आधीपासून जे आरक्षण मिळतं तेच मिळणार असे विधान आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. याच पार्श्वभूमीवर बोलताना राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारने आता कुणबीकरण थांबवावे अशी मागणी केली आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण जरांगे पाटील करत आहेत. मात्र मनोज जरांगे यांना आयोग, मसुदा नेमका किती कळतो? असा थेट सवालही भुजबळ यांनी उपस्थित केला.

छगन भुजबळ म्हणाले की, ''मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यायला आमचा पाठिंबा आहे. मात्र ओबीसीतून आरक्षण देण्याला आमचा विरोध आहे. कारण अलिकडे अनेक मराठा समाजाच्या लोकांना खोट्या नोंदी घेऊन कुणबी दाखले देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याचे पुरावे आमच्याकडे आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये एका घरात ८६ कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले. हे सर्व तिथल्या समाजाच्या लोकांना कळंत. त्यामुळे सरकारने आता कुणबीकरण थांबवावं'', असे भुजबळ म्हणाले.

# मराठा समाजाला सरसकट स्वतंत्र आरक्षण देणार

## मुख्यमंत्र्यांचे सुतोवाच; ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नसल्याचे स्पष्टीकरण

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठीचा सर्वेक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत मोठा निर्णय घेतला आहे. मराठ समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे असे आरक्षण जे ओबीसी किंवा इतर कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्हाला देता येईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. म्हणजेच मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून नव्हे तर स्वतंत्र आरक्षण देण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य मागासवर्गाचा मराठा सर्वेक्षण अहवाल येत्या २० फेब्रुवारीला विशेष अधिवेशनात मांडला जाणार आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षणाबाबत सरकारची भूमिका मांडली. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत, त्यांना आधीपासून लागू असलेलं आरक्षण लागू असेल. पण ज्यांच्याकडे कुठल्याही नोंदी नाहीत, त्यांना याआधी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने जे आरक्षण दिलं होतं, तसं सर्व मराठा समाजाला (नोंदी नसलेल्यांनाही) देण्यात येणार आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

दरम्यान, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं, यासाठी मनोज जरांगे यांनी सहा दिवसांपासून उपोषण सुरु केलं आहे. मात्र आता राज्य सरकारने ओबीसी कोट्यातून आरक्षणाऐवजी मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत मुख्यमंत्री म्हणाले, ओबीसी किंवा इतर समाजाला धक्का न लागता, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार सुरुवातीपासूनच सकारात्मक आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या, त्यांना ती ती प्रमाणपत्र देण्यात आली. सरकार सकारात्मक असताना आंदोलन करणं उचित राहणार नाही. त्यांनी आंदोलन मागे घ्यावं, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी आज मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला. यावेळी मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. वर्षा येथे आज सकाळी हा अहवाल सुपूर्द करतेवेळी आयोगाचे सदस्य देखील उपस्थित होते. यावेळी आयोगासह संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा अशा साडे तीन ते चार लाख अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. या सर्वेक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बैठका घेऊन युद्ध पातळीवर हे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

## धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी उच्च न्यायालयाने फेटाळली

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण तापले असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने धनगर समाजाला मोठा झटका दिला आहे. धनगर समाजाला अनुसूचित जाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण मिळावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, या सगळ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या. त्यामुळे धनगर समाजाच्या एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळवण्याच्या अपेक्षांना सुरुंग लागला आहे. आता धनगर समाजाला सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा एकमेव पर्याय शिल्लक आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये धनगर समाजाने अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे, यासाठी राज्यभरात आंदोलन आणि मोर्चे काढले होते. सध्या धनगर समाजाला एनटी (भटक्या जमाती) प्रवर्गाचे साडेतीन टक्क्यांचे आरक्षण आहे. एसटी प्रवर्गाचे आरक्षण मिळाले असते तर धनगर समाजाचे आरक्षण ७ टक्क्यांवर गेले असते. मात्र, धनगर समाजाला अनुसूचित जातींचे आरक्षण देण्यासाठी पूर्तता आणि पडताळणीचे निकष पूर्ण होत नसल्याचे कारण देत न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल काथा यांच्या खंडपीठाने सर्व याचिका फेटाळून लावल्या. धनगर समाजाची अनुसूचित प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी रास्त नाही. ती मान्य करता येणार नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदविले.

## सगेसोयरे कायद्याच्या अंमलबजावणीवर मनोज जरांगे ठाम

जालना दि.१६ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठीच्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय आंदोलन मागे नाहीच, असा निर्धार मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मागासवर्ग आयोगाने अहवाल दिला आहे. २० फेब्रुवारीला मराठा आरक्षणासाठी सरकारचं अधिवेशन आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांना कुणबी प्रमाणपत्र दिलं जाईल. नोदी नसलेल्या मराठ्यांसाठी स्वतंत्र मराठा आरक्षण देणार असल्याचं सरकारचं म्हणणं आहे. आरक्षण टिकावं म्हणून मागासवर्ग आयोगाचा अहवाल आहे.

जरांगे यांनी आंतरवाली सराटी येथील आंदोलनस्थळी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितलं की, आम्ही सगेसोयरे कायद्याच्या अंमलबजावणी वर ठाम आहोत. मराठ्यांना फसवलं तर सोडणार नाही. सरकारनं धोरण ठरवलं असलं तरी मराठेही धोरण ठरवणार असल्याचं जरांगेंनी स्पष्ट केलं आहे

''ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतायत आणि ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्यांना सग्यासोयऱ्याचा कायदा आहे, त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असं जरांगेंनी म्हटलं आहे. मराठवाड्यातील सगळा मराठा कुणबी आहे. कुणबी नोंदी सापडल्या त्यांना द्यावेच लागेल, मात्र मागासवर्गीय अहवाल घेऊन ते आरक्षण देणार, मात्र ते चालणार नाही, सग्या सोयऱ्यांची अंमलबजावणी केल्या शिवाय कोणाला सोडणार नाही. मागासवर्ग आयोगाचे पण राहु द्या, ज्यांना नकोय त्यांना जोर जबरदस्ती नाही. २० तारखेपर्यंत अंमलबजावणी करा. आंतरवलीसह सर्व गुन्हे मागे घ्या. २० तारखेपर्यंतच मी उपोषण करत असतो, सरकारनं सरकारचं धोरण ठरवलं आहे, मराठे मराठ्यांचे धोरण ठरवणार आहेत. मागासवर्गीय आयोग, सग्यासोयऱ्यांचे आणि कुणबी या सर्वच बाजूने मराठयांना आरक्षण मिळणार'', असं जरांगेनी म्हटलं आहे.

## अहवाल कोर्टात टिकणार नाही, पुन्हा मराठा समाजाची फसवणूक होईल-प्रकाश शेंडगे

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मराठा सर्वेक्षण अहवाल आज सुपूर्द करण्यात आला आहे. हा अहवाल २० फेब्रुवारीला विशेष अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. यावर ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी आपली प्रतिक्रिया देत पुन्हा एकदा मराठा समाजाची फसवणूक होईल असे म्हटले आहे.

प्रकाश शेंडगे म्हणाले की, न्यायमूर्ती शुक्रे यांनी घिसाड घाईने केलेला हा अहवाल आहे. आमचा याला आक्षेप आहे. घिसाड घाईने तयार केलेला हा अहवाल कोर्टात टिकणार नाही आणि पुन्हा एकदा मराठा समाजाची फसवणूक होईल, असे ते म्हणाले.

हा अहवाल तयार करताना अनेकांनी खोटी माहिती भरली आहे. जर बंगला असेल तर झोपडी आहे असे सांगितले आहे. मात्र, आधार कार्डचा नंबर ओरिजनल जोडला आहे. यामुळे संबंधित व्यक्तीची आर्थिक संपत्ती किती आहे हे स्पष्ट होणार आहे. कारण आधारकार्ड हे बँक खात्याला लिंक असते. त्यामुळे हा अहवाल आरक्षण मिळवून देणारा ठरणार नाही असे ते म्हणाले.

## नरेंद्र मोदी खोट्यांचे सरदार, २०१४ साली दिलेल्या गॅरंटीचे काय झाले?; खरगेंचा सवाल

लोणावळा दि.१६ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच मोदीची गॅरंटी, मोदीची गॅरंटी असे बोलत असतात, त्यांच्या बोलण्यात मी, मी पणा जास्त असतो. आपण 'आम्ही भारताचो लोक' असे म्हणतो परंतु मोदी मात्र मी, मी असेच करतात. नरेंद्र मोदी सातत्याने खोटे बोलत असतात, ते खोट्यांचे सरदार आहेत. मोदींनी आजपर्यंत दिलेली एकही गॅरंटी पूर्ण केली नाही. २०१४ मध्ये मोदींनी काळा पैसा आणून प्रत्येकाला १५ लाख रुपये प्रत्येकाला देण्याची, दरवर्षी २ कोटी नोकरी देण्याची, शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करू, या गॅरंटी दिल्या होत्या या मोदी गॅरंटीचे काय झाले? असा सवाल काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केला आहे. लोणावळ्यात आयोजित केलेल्या काँग्रेसच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबीराचे उद्घाटन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी ऑनलाईन केले. यावेळी ते बोलत होते.

खरगे पुढे म्हणाले की, काँग्रेसप्रणित युपीए सरकारने २००४ ते २०१४ याकाळात अन्न सुरक्षा कायदा आणला, रोजगार हमीचा मनरेगा कायदा केला, सर्व शिक्षा अभियान आणले, माहिती अधिकार कायदा आणला. मोदी सरकारने दहा वर्षात काहीही दिलेले नाही. नरेंद्र मोदी, भाजप, आरएसएसने देशाला स्वातंत्र दिलेले नाही. काँग्रेस पक्ष, महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल, लोकमान्य टिळक या महान नेत्यांनी देशाला स्वातंत्र मिळवून दिले. स्वातंत्र्य चळवळीत भाजपचे काहीच योगदान नाही. काँग्रेस पक्षाचा जन्म मुंबईत झाला आहे, आज या पक्षाला १३९ वर्ष झाली आहेत. काँग्रेस पक्ष खोटे बोलणारा पक्ष नाही.

## ओबीसींचे ०.१ टक्केही आरक्षण कमी होणार नाही-चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- राज्य मागासवर्ग आयोगाने प्रस्ताव दिलाय. सर्वेक्षण करून मराठा समाजाला वेगळ आरक्षण देण्याकरता हे सर्वेक्षण झालेले आहे. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे. आम्ही सुद्धा मराठा आरक्षण द्यावे आणि कोर्टाच्या चौकटीत बसवून द्यावे, या मताचे आहोत. मराठा समाजाला देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण दिले होते. आता सुद्धा जे विशेष अधिवेशन आहे. त्यामध्ये सर्व पक्षीय आमदार बहुमताने मुख्यमंत्री जो कायदा आणतील त्याला पाठिंबा देतील, आमचाही पूर्ण पाठिंबा राहील. ओबीसीमधून शून्य पॉईंट एक टक्का आरक्षणही कमी केले जाणार नाही. मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे, ही आमची भूमिका असल्याची भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. सरकारने भूमिका घेतलेली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या आरक्षणाबाबत सरकारने पूर्ण अभ्यास केलेला आहे. सरकारने कायद्याच्या अडचणी तपासल्या सोडवल्या असतील असे मला वाटते. मराठा समाजाला दिलेले आरक्षण हे टिकणारे आरक्षण असेल असेच मला वाटते, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे.

## अजित पवारांनी एससी-एसटी, ओबीसींचा निधी अडवला होता

### जितेंद्र आव्हाडांचा आरोप

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अजित पवार अर्थमंत्री असताना त्यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी समाजाच्या कल्याणासाठी वापरला जणारा निधी रोखला होता. छगन भुजबळ आणि आदिवासी विभागाचे मंत्री विजयकुमार गावित हे देखील माझा हा आरोप मान्य करतील. असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

अजित पवार यांनी आज बारामती येथे एक सभा घेतली. या सभेला संबोधित करताना अजित पवारांनी बारामतीकरांना भावनिक आवाहन केलं. ते म्हणाले, 'आगामी निवडणुकीत माझ्याविरोधात प्रचार केला जाईल, त्याला बारामतीकरांनी योग्य उत्तर द्यावं.' तसेच अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर टीकाही केली. ते म्हणाले, 'मला पक्षाचा अध्यक्ष होण्यापासून



वंचित ठेवलं होतं.' यावर शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेतून अजित पवारांच्या टीकेचा समाचार घेतला.

आणखी टीका करतांना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, अजित पवार भाषणाची वेळ आली की मंचावरून पळून जायचे. संसदेत भाषणाची वेळी आली की नेमके बाथरूममध्ये असायचे. कारण त्यांना हिंदी बोलता येत नाही, इंग्रजीदेखील बोलता येत नाही. अजित पवारांच्या या मर्यादा महाराष्ट्राला माहिती नव्हत्या. तर आता आम्हाला त्या मर्यादा लोकांना सांगाव्या लागतील. जेव्हा जेव्हा त्यांची दिल्लीत भाषण करायची वेळ यायची तेव्हा तेव्हा ते बाथरुममध्ये असायचे. कारण भाषण करायला अभ्यास लागतो, मांडणी लागते. यांचा पीए यांना भाषण लिहून द्यायचा मग ते भाषण बोलून दाखवायचे.

## लोकसभेसाठी बारामतीत नणंद-भावजय तगडी लढत होण्याची शक्यता

बारामती, पुणे दि.१६ (प्रतिनिधी)- बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या लोकसभा एन्ट्रीची नांदी झाली आहे. बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांची माहिती आणि कार्याचा आढावा घेणारा विकास रथ शहरात फिरत आहे. त्यामुळे बारामतीत आता नणंद-भाजवयांची लढतीचे स्पष्ट संकेत आहेत. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर सुनेत्रा पवार यांची बारामती लोकसभेच्या उमेदवारीसाठी प्रचंड चर्चा होती.

अजित पवार हे शरद पवारांपासून वेगळे झाल्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये सहभागी झाले. मात्र बारामती लोकसभेसाठी अजित पवार उमेदवार कोण देणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. बारामतीतील उमेदवारावर लोकसभेची गणितं अवलंबून आहे. अजित पवारांनी त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उभी करावी, असं भाजपच्या नेतृत्वाला अपेक्षित आहे. त्यासोबतच बारामतीतील अजित पवारांचे कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांचीदेखील हिच ईच्छा व्यक्त केली होती. आता त्याच दिशेने अजित पवार पावलं टाकताना दिसत आहे.

## पृथ्वीराज चव्हाणांनी तोलूनमापून बोलले पाहिजे-अशोक चव्हाण

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- अशोक चव्हाण यांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेणं हे दुर्दैवी आहे असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले होते. यावर आता भाजप नेते अशोक चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी तोलूनमापून बोललं पाहिजे असे अशोक चव्हाण यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हंटले आहे.

यावर बोलता अशोक चव्हाण म्हणाले, 'माझ्यापेक्षा माझ्या कारकिर्दीबाबत पृथ्वीराज चव्हाण यांना अधिक माहीत आहे. ते माझे सहकारी होते. मी त्यांच्या व्यक्तिगत बोलणार नाही. त्यांनी कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी तोलूनमापून बोललं पाहिजे. आम्ही त्यांचा मानसन्मानच केला आहे', अशी भावनिक प्रतिक्रिया अशोक चव्हाण यांनी दिली.

तसेच मला राज्यसभेवर पाठवण्याचं ठरले होते असे म्हणणार नाही. माझ्या अनुभवाचा उपयोग राज्यसभेत व्हावा असे त्यांना वाटलं असेल. त्यामुळे त्यांनी मला राज्यसभा दिली असावी. मी शेवटच्या क्षणापर्यंत काँग्रेससाठी काम करत होतो. दोन वर्षापूर्वी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला नाही. भाजपमध्ये जायचा निर्णय घेतला. तेव्हा बैठक घेतली आणि संध्याकाळी गाडी पकडून मुंबईत आलो. मला राज्यसभेवर घेतलं याचा अर्थच असा आहे की मी पक्षाला अधिक वेळ द्यावा. त्यात काही गैर नाही', अशी भूमिका अशोक चव्हाण यांनी मांडली.

## मुख्यमंत्री पदासाठी हपापलेलो नाही-अजित पवार

पुणे दि.१६ (प्रतिनिधी)- मी मुख्यमंत्रीपदासाठी हपापलेलो नाही. कोणाचाही पक्ष चोरलेला नाही असे विधान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. तसेच काही लोकं थोडं भावनिक करण्याचं प्रयत्न करतील, पण भावनिक होऊन रोजीरोटीचा प्रश्न सुटत नाही असेही ते म्हणाले. घरातील सगळे माझ्याविरोधात, फक्त तुम्हीच माझ्यासोबत आहात असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांना भावनिक साद घातली. उपमुख्यमंत्री अजित पवार आज बारामती दौऱ्यावर होते. यावेळी ते बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, मित्रांनो मी तुम्हाला दाव्याने सांगेने की, तुमची साथ आहे, तुमचा पाठिंबा आहे, तुमची एकजूट आहे, तोपर्यंत माझं काम अशाच प्रकारे सुरूच राहिल. काम करणं हे महत्त्वाचं आहे आणि त्यापद्धतीने आपल्या सर्वांचं काम चाललेलं आहे. मी पुन्हा सांगतो की, काही लोकं थोडं भावनिक करण्याचं प्रयत्न करतील, पण भावनिक होऊन रोजीरोटीचा प्रश्न सुटत नाही. भावनिक होऊन कामे होत नाहीत'', असे म्हणत त्यांनी सुप्रिया सुळे यांना अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

## भास्कर जाधव जन्मभर लक्षात ठेवेन, तुला सोडणार नाही-निलेश राणे

गुहागर दि.१६ (प्रतिनिधी)- भास्कर जाधव यांनी आमच्या शेपटावर पाय ठेवला आहे. मी या जन्मात ही गोष्ट विसरणार नाही. मी आता तुला सोडणार नाही, अशा आक्रमक शब्दांत निलेश राणे यांनी भास्कर जाधव यांना लक्ष्य केले. ते शुक्रवारी गुहागर येथील जाहीर सभेत बोलत होते. या सभेपूर्वी चिपळूणमधून येताना भास्कर जाधव यांच्या कार्यालयासमोर ठाकरे गट आणि भाजप कार्यकर्त्यांचा राडा झाला. यावेळी झालेल्या दगडफेकीत काही दगड निलेश राणे यांच्या गाडीवर पडले. त्यामुळे आक्रमक झालेल्या निलेश राणे यांनी आपल्या भाषणात भास्कर जाधव यांना अक्षरश: शिव्यांची लाखोली वाहिली.

भास्कर जाधव यांनी यापुढे सभा घ्याव्यात. ते सभा घेतील, तिकडे मीदेखील सभा घेईन. पण तू राहिलास तर पुढची सभा होईल, असा गर्भित इशारा यावेळी निलेश राणे यांनी दिला. भास्कर जाधव विनाकारण सगळ्या सभांमध्ये नारायण राणे यांच्यावर टीका करतात. आमच्यावर केलेली टीका आम्ही खपवून घेऊ. पण राणे साहेबांविषयी वाकडंतिकडं बोललेलं आम्ही खपवून घेणार नाही, असे निलेश राणे यांनी म्हटले.

निलेश राणे यांनी आपल्या भाषणात (पान ४ वर)

# परिवर्तनाची सुरुवात आपल्यापासूनच!

बंधनापासून किंवा अन्यायापासून मुक्ती अशा अर्थाचा 'स्वातंत्र्य' हा शब्द. अर्थातच काय तर स्त्री स्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांची बंधनातून मुक्तता. सर्व क्षेत्रांत सतत पुढे जाण्यासाठी धावणारा आपला समाज स्त्रियांच्या बाबतीत मागे का जातो? हीच आपल्या समाजाची मोठी खंत आहे.

सहस्त्री सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहे असे म्हटले तरीही तिच्यावर अन्याय होताना आजही दिसून येतच आहे. आजही वर्तमानपत्र उघडले की जास्तीत जास्त स्त्रियांबाबतच्या अन्यायाच्या बातम्या जास्त असतात. जसं की नवविवाहितेच्या आत्महत्या, सुनेचा छळ करून मारले, अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या, अशाच बातम्या असतात. समाजाचा आपण एक भाग आहोत याची जाणीव ही प्रत्येकालाच व्हायला पाहिजे.

या देवी सर्व भुतेषू, मातृरुपेण संस्थिता,
नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नमः !

असे म्हणून आपण देवीची पूजा करतो आणि त्याच देवीरूपी स्त्रीची अशी विटंबना करतो. पण हे वचन स्त्रीने सिद्ध करून दाखवले आहे. प्रत्येक स्त्रीच्या मग ती ग्रामीण असो किंवा शहरी असो, तिच्यात एक अशी सुप्त शक्ती असते की ती कोणत्याही संकटांशी दोन हात करू शकेल. आज स्त्रीला असेच स्वातंत्र्य हवे आहे. आपल्या सुप्तगुणांनी ती दुसऱ्याचेही जीवन फुलवते. 'अबला नहीं सबला हैं तू, नारी नहीं चिंगारी है तू' हे आजच्या स्त्रियांनी लक्षात घेतले पाहिजे. स्त्री ही माणूस आहे आणि तिलाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे.

आजच्या युगामध्ये स्त्री ही पुरुषाएवढीच आघाडीवर असलेली आपल्यास पाहायला मिळते. शैक्षणिक असो किंवा सामाजिक, राजकीय क्षेत्रात ती पुरुषांच्या बरोबरीने काम करताना प्रगतीपथावर असलेली दिसून येते. स्त्री सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहे, साहजिकच पूर्वीपेक्षा आतच्या युगात स्त्रीला समाजात मोठे स्थान प्राप्त झाले आहे. एकूण सर्वचबाबतीत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना आघाडीवर आहेत. हे जरी खरे असले तरी हे काही ठरावीक गोष्टींसाठीच मर्यादित आहेत. स्त्री सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे असे म्हटले तरीही तिच्यावर अन्याय होताना अजूनही दिसून येतच आहे.स्त्रियांना मिळालेली बुद्धिमत्ता ही निसर्गताच त्यांच्याकडे असते असं खुद्द महाकवी कालिदासानं म्हटलं आहे, असे असूनही 'बायकांना काय कळतं?' असं बोलून मोकळे होणारे असंख्य लोक समाजात वावरताना दिसतात, समाजाने सुद्धा या सर्वात तिची साथ दिली पाहिजे, कारण स्त्री जन्माला येईल तेव्हाच तिच्या गर्भातून समाज जन्म घेईल.

पुरातन काळापासून आई अथवा माता या शब्दांना एक विशेष महत्त्व आहे,अनेक शिलालेखांमध्ये मातृदेवतेचे वर्णन केलेले दिसते, यावरून प्राचीन काळात स्त्रीला किती महत्त्व होते हे दिसून येते. पण आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी झालेली दिसते. बदल घडवून आणण्यासाठी शिवराय, लोकमान्य टिळक, भगत सिंग यांसारखे युगपुरुष जन्माला यावेत असे ओरडून सांगणारा समाज मात्र त्यांना जन्म देणारी एक स्त्रीच होती हे मात्र विसरत आहेत. फक्त चूल आणि मूल या संकल्पनेत न अडकता त्यांनी आपल्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. आज २१व्या शतकात नोकरी अथवा शिक्षणाच्या निमित्ताने स्त्रियांनी उंबरठा ओलांडला असला तरी अजूनही अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत आहे. समस्या अनेक आहेत, जसे की स्त्रीभ्रूण हत्या, सासू आणि सून यांच्यातील नाते, हुंडा पद्धती, स्त्री रूढी-परंपरा यापेक्षाही अनेक समस्यांना स्त्रियांना तोंड द्यावे लागते. जसे की, मुलीने काही चूक केली की, लगेच तिच्या आईला दोष दिला जातो. आज देश इतका प्रगत आहे तरी पण स्त्रियांची परिस्थिती आहे तशीच आहे. हीच स्त्री जर रात्री उशिराहून घरी आली तर तिच्या घरचे लगेच तिला दूषणं देऊ लागतात आणि बाहेरच्या समाजाला तर तिच्या चारित्र्यावर बोट ठेवायला लगेच जागा मिळते. याच जागी पुरुष असेल तर आपला या गोष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोन लगेच बदलतो.

मुलगा व मुलगी होणे हे स्त्रीच्या हातात नसते, हे कळून पण काही गुन्हा नसतानाही स्त्रीला अन्याय सहन करावा लागतो. साधारपणे लग्नाला ५-६ वर्ष झाली आणि घरात पाळणा हलण्याची चिन्हे नाही दिसली तर डॉक्टरकडे तपासण्या चालू होतात आणि त्यात प्रथम तपासण्या या स्त्रीच्याच केल्या जातात. ऐन तारुण्यात पतीच्या निधनाने विधवा झालेली स्त्री आपण पाहतो; पण जर मूल बाळ नसेल तर ठीक, किमान दुसऱ्या लग्नाचा विचार केला जातो. पण असे नसल्यास जर एक-दोन मुले असतील तर तिला आपले उभे आयुष्य एकटीने काढावे लागते. हेच पुरुषांच्या बाबतीत घडले तर वर्षाच्या आत त्याच्या दुसऱ्या लग्नाची बोलणी सुरू केली जाते. तसेच आज बलात्कारी स्त्रीला न्याय मिळवताना सुद्धा कोर्टापुढे पुन्हा पुन्हा शाब्दिक बलात्काराला त्या स्त्रीलाच सामोरे जावे लागते. आज स्त्रिया कितीही आधुनिक झाल्या, तरी पण त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांचे प्रकार बदलले, तेही आधुनिक झाले. वेगवेगळ्या सोशल साईट्सवर जाहीररित्या बदनाम करणे, फोटोचा दुरुपयोग करून ब्लॅकमेल करणे, अश्लील फोटो तयार करून त्या स्त्रीची बदनामी करणे हे प्रकार अगदी सर्रास चाललेले आपल्याला दिसतात. आजही काही भागात बालविवाह, सती प्रथा अशा घटनाही घडताना दिसतात. स्त्री-पुरुष समानतेचा कितीही आव आणला तरी प्राधान्य नेहमी मुलालाच दिले जाते, असे का? तर मुलगा वंशाचा दिवा म्हणून. मग मुलगी कोण? ती वंशाची ज्योत होऊ शकत नाही का? स्त्रियांची अशी स्थिती पाहून फक्त एकच प्रश्न मनात येतो अजून किती काळ स्त्रियांनी अत्याचार सहन करत आपले आयुष्य व्यतित करावे? स्त्री या शब्दाबरोबर प्रेम, वात्सल्य, स्नेह, ममता या भावना समोर येतात हे लोक विसरत चालले आहे. स्त्री आणि पुरुष दोघांनाही एकमेकांची साथ सारखीच हवी असते. हा संसाररूपी रथ एका चाकाच्या साहाय्याने चालवता येत नाही.

तरी सुद्धा कायम स्त्रीवरच अन्याय का? नेहमी स्त्रीलाच सगळ्याचा विचार करून का तडजोड करावी लागते? ही परिस्थिती कोठेतरी बदलायला हवी आणि त्याची सुरुवात आताच व्हायला हवी ना? म्हणून आपण म्हणजेच स्त्रियांनी बदलायला हवे, ते म्हणतात ना, बदल किंवा परिवर्तन नेहमी स्वतःपासून सुरू केले तर त्याचा फायदा जास्त होतो, त्याचप्रमाणे आपण बदलली, तर ही परिस्थिती नक्कीच बदलेल आणि या बदलण्यालाही अर्थ प्राप्त होईल. त्यामुळे प्रत्येकीने स्वयं आत्मपरीक्षण करावे, विचारांचे परिवर्तन होणार नाही तोपर्यंत या समस्या सुटणार नाहीत आणि त्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्री समाजाच्या प्रगतीचा मार्ग खुला होणार नाही.

# आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके



महाराष्ट- ही थोर राष्ट-भक्त, थोर समाज सुधारकांची भूमी आहे. तव्दतच या भूमीतून हजारो क्रांतीकारकांनी जन्म घेवून भारत मातेच्या मुक्ततेसाठी प्राणाची आहुती वाहिलेली आहे. या क्रांतीकारकात आद्य क्रांतीकारक म्हणून वासुदेव बळवंत फडके यांचे नाव अग्रभागी आहे. इंग्रजानीही वासुदेव बळवंत फडके यांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी बंड करणारे पहिले क्रांतीकारक म्हणून शेवटपर्यंत मानलेले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा मार्ग प्रथम वासुदेव बळवंत फडके यांनीच अवलंबिला. आपल्या विशुद्ध देशभक्तीमुळे फडके नंतरच्या कित्येत क्रांतीकारकांना आणि देशभक्तांना स्फूर्ती देणारे राष्ट-पुरूष होवून बसले.

क्रांतीकारकाचे आणि स्वातंत्र्याच्या उपासकांचे वासुदेव फडके आद्यपुरूष म्हणून गणल्या जातात. स्वातंत्र्य हा शब्द तत्कालीन समयी उच्चारण्याची कोणाचीही प्राज्ञा नसताना ते शब्द ते ध्येय फडकेंनी उघड उघड घोषित केले. सरकारी नोकरीत असतानाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा डंख फुंकणारे ते एकमेव भारतीय होते. यावरून त्यांची प्रमुख राष्ट-निष्ठा व राष्ट-प्रेमाची भावना दिसून येते.

वासुदेवाचा जन्म बळवंतराव व भिकुताई यांच्या पोटी ४ नोव्हेंबर १८४५ रोजी झाला. त्या दिवशी नातवाच्या जन्म दिनानिमित्त शिरढोण येथील फडक्याच्या भव्य वाड्यात अनंतराव (वासुदेवाचे आजोबा) यांनी आनंदोत्सव साजरा केला. फडके घराणे राष्ट-भक्ती व राष्ट-निष्ठेने प्रेरित होते ते सर्वगुण चिमुकल्या वासुदेवात उतरले. पुरेसे शिक्षण झाल्यावर त्यांचा वयाच्या १५ व्या वर्षीच विवाह झाला. त्यांनी रेल्वे खात्यात नोकरीही सुरू केली. परंतु ब्रिटीशांची सत्ता असलेल्या या मातृभूमीतील अनेक लोक अन्नान्न करीत उपाशी मरत होते. अन्याय अत्याचाराची सीमा राहिलेली नव्हती. जुलमी इंग्रज राजवट देशवासीयांना तुच्छ लेखीत होती. जनावरापेक्षाही हीन लेखल्या जात होते. अन्याय अत्याचारी इंग्रजी राजवट त्यांना असह्य झाली त्यांनी भारतमातेच्या मुक्ततेसाठी व जुलमी इंग्रजांना देशाबाहेर घालवून लावण्यासाठी निश्चय केला.

**भारतीयात देशाभिमान जागृत केला-** इंग्रज राजवटीत भारतीयावर नौकरीच्या बाबतही अन्याय व्हायचा कमी पगाराच्या जागी भारतीयांची नेमणूक तर मोठ्या पगाराची नौकरी इंग्रजांना मिळायची हा अन्याय फडक्यांच्या नजरेतून सुटत नव्हता. इंग्रजांनी राष्ट-ावर जे अन्यायकारक शासन लादले याबाबत ते व्याख्यान देवून देशवासीयांत जागृकता निर्माण करीत. देशभक्ती व समाजप्रेम यांनी भरलेली त्यांची व्याख्याने तत्कालीन तरूणांना स्फूर्तीदायक व प्रेरणादायी वाटत वास्तवतेच्या विचारामुळे भारतीय जागृक झाले. स्वातंत्र्य आणि स्वराज्य यांच्या शिवाय भारतीयांचे दुःख व यातना संपणार नाही हे लोकांना व्याख्यानातून सांगत. वैधचळवळीला हा मार्ग अनुसरून जनतेस लढ्यासाठी सिद्ध करण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता.

**१८७६-७७ च्या भीषण दुष्काळात देशबांधवांची दुर्दशा-** १८७६-७७ चा दुष्काळ खूपच भीषण होता. पाण्याची तीव्र टंचाई होती. उपासमारीने लोक मृत्यूमुखी पडू लागले तरी ब्रिटीश सरकार उपाययोजना करीत नव्हते. ती सर्व शोकवृत्ते वासुदेव यांच्या कानावर पडत असत. पाषाण हृदयी ब्रिटीश शासनाला या दुष्काळाबाबत काहीच गांभीर्य नव्हते. नागरिकांचे आरोग्य ढासळायला लागले. दुष्काळामुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या देशबांधवांना पाहून फडके यांचा मनस्ताप वाढला. ब्रिटीश सरकारच्या बेपवाईमुळे त्यांच्या मनात संतापाची लाट उसळली. वैधमार्गाचे आंदोलन मंदगतीने लोकजागृती करणारे वाटत होते. हे फडके जाणत होते. तत्कालीन तरूणही वैफल्यग्रस्त व निराश होत असे हे फडके जाणत होते. त्यामुळे तत्कालीन तरूणांची मने क्रांतीमार्गाकडे धाव घेण्यास उत्सुक होती. ब्रिटीश सरकारने याच काळात आर्म्स ॲक्ट लागू केला यामुळे वासुदेव फडके अस्वस्थ झाले. आपल्या देशवासीयांना न्याय मिळत नाही. सातत्यपूर्ण अन्याय होत आहे. हे पाहून फडके यांनी क्रांतीकारक मार्गानेच स्वातंत्र्याचा लढा करण्याचे ठरविले आणि या लढ्यात सर्व भारतीयांना सामावून लढा देण्याचे त्यांनी निर्णय घेतला.

**ठिकठिकाणी बंड व उठाव-** वासुदेव बळवंत फडके यांनी संघटन करण्याचे काम आरंभ केले. यासाठी छोट्या-मोठ्या घटना लुटालूट, जाळपोळ, दंगली सुरू झाल्या. उद्देश एकच की ब्रिटीश सरकारला जेरीस आणने. मराठा युद्धपद्धती आरंभ झाली. वासुदेव बळवंत फडके यांनी आपला जाहिरनामा प्रसिद्ध केला यात हिंदुस्थानच्या आर्थिक शोषणाच्या ब्रिटीश सरकारच्या धोरणाचा धिक्कार करण्यात आला. येथील जनतेला निसर्गदत हक्क म्हणून आर्थिक सहाय्य मिळाले पाहिजे, अशी मागणी होती अशा प्रकारचे हे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यातील ब्रिटीश सरकारला केलेले हे पहिलेच आव्हान होय. बंडाच्या प्रदेशात सैन्याची रवानगी शासनाने केली. ठिकठिकाणी बंड होवू लागले. कुठे सरकारी मालमत्तेची लूट तर कुठे जाळपोळ अशी हळूहळू देश स्वातंत्र्याची जाणीव लोकांना होवू लागली व बंड विस्तारू लागले. बंड करण्याबद्दल वासुदेव फडके यांना कधीच पश्चाताप झाला नाही. फडके यांनी हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय प्रथमच त्यांनी उघडपणे घोषित केले आणि सशस्त्र बंडाच्या मार्गानेच ते गाठण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारच्या प्रयत्यांनी परतंत्र्यात असह्य होवून बसलेल्या स्वातंत्र्याकांक्षी जनतेला स्वातंत्र्यासाठी व मातृभूमीच्या मुक्ततेसाठी संघर्ष करण्याची चेतना मिळते आणि असे देश बांधव आपल्या देशात आहेत. असा आत्मविश्वासही त्यांना येतो. त्यामुळेच स्वातंत्र्याच्या लढ्यात अशा उठावणीला मानाचे स्थान असते. ते स्थान वासुदेव फडके यांच्या उठावणीला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात आहे. यात शंका नाही. अशा या महान क्रांतीकारकांचे बलिदान १७ फेब्रुवारी १८८३ साली झाले.

वासुदेव बळवंत फडके यांनी लढा अशा समयी दिला ज्या समयी देशवासीयांना स्वातंत्र्य काय असते हे माहिती नव्हते. महाराष्ट-ात राष्ट-ीयत्व व स्वातंत्र्यप्रियता, राष्ट-निष्ठा हे गुण आजही लोकांत दिसून येतात ते केवळ थोर क्रांतीकारकांच्या राष्ट-कार्यामुळेच. फडके यांनाच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याचे पहिले प्रवर्तक मानन्यात येते. त्यांनी जागृत केलेली राष्ट-निष्ठा आजही राष्ट- भक्तांना प्रेरीत करीत आहे. वासुदेव बळवंत फडके यांच्या बलिदानाचे सार्थक करावयाचे असेल तर आजही देशांतर्गत व देशाच्या सीमेवरील समस्या दूर करणे गरजेचे आहे. देशाच्या रक्षणार्थ देशात शांतता, सुव्यवस्था राहो व देशवासीयांत राष्ट-निष्ठा, राष्ट-प्रेम, राष्ट-भक्ती उत्पन्न होवो. देशाची अंतर्गत सुरक्षा राखण्याचे बल आम्हास मिळो, अशी प्रार्थना व प्रतिज्ञा करू या तरच वासुदेव फडके यांच्या आत्म्याला शांती मिळेल.

**जय हिंद-जय महाराष्ट-!**

**स्मारके** - पुण्यात चाललेल्या खटल्यादरम्यान फडक्यांना संगमपुलाजवळ एका कोठडीत ठेवण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर तेथे महाराष्ट्र पोलिसच्या गुप्तचर खात्याने त्यांचे स्मारक उभारले आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या आनंदमठ कादंबरीमध्ये ब्रिटिश सरकारविरुद्धचे फडक्यांचे अनेक कारनामे वापरले आहेत. यावर सरकारने आक्षेप घेउन कादंबरी प्रकाशित न होऊ दिल्यामुळे चट्टोपाध्यायनी पाचवेळा बदल केल्यावर मगच त्याचे प्रकाशन झाले.

**१९८४ साली भारतीय टपाल खात्याने फडक्यांचे चित्र असलेले ५० पैश्यांचे तिकीट प्रकाशित केले.**

**मुंबईतील मेट्रो सिनेमाजवळील एका चौकाला वासुदेव बळवंत फडक्यांचे नाव दिलेले आहे.**

**क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नावाचा विश्राम बेडेकर दिग्दर्शित चित्रपट १९५० साली प्रकाशित झाला. तसेच वासुदेव बळवंत फडके नावाचा मराठी चित्रपट डिसेंबर २००७मध्ये प्रकाशित झाला.**

**- धोंडिरामसिंह राजपूत**

# मराठा समाजासाठी शासनाच्या विविध योजना; भरीव निधीचा दिलासा

राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात असलेल्या मागणीच्या अनुषंगाने इतर समाजाप्रमाणेच मराठा समाजासाठी देखील विविध योजना राबविण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. त्या अनुषगाने गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध योजनांमुळे मराठा समाजास मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली विविध योजनांसाठी भरीव निधी उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये शिक्षणाच्या योजनांना सर्वाधिक प्राधान्य दिले असल्याने मराठा समाजातील नवी पिढी घडण्यास निश्चितच मदत होणार आहे. शासनाकडून या योजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी होत असल्याने मराठा समाजाकडून शासनाबद्दल धन्यवाद देण्यात येत आहेत.

**मराठा समाजाच्या कल्याणासाठी घेतलेले महत्त्वाचे निर्णय**

या योजनांमध्ये प्रामुख्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत वैयक्तिक आणि गट कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत ७४ हजार ८७३ लाभार्थ्यांना ५ हजार ६५९ कोटी बँक कर्ज मंजूर त्यावरील ६०८.१२ कोटी रूपयांचा व्याज परतावा वितरित करण्यात आला आहे. महामंडळाकडून ३५ गट प्रकल्पांना ३.३५ कोटी कर्ज वितरित करण्यात आले आहे. सारथी संस्थेचे पुणे येथील मुख्यालय इमारत आणि ६ विभागीय कार्यालये आणि लातूर व कोल्हापूर येथील उपकेंद्र तसेच ५०० मुले आणि ५०० मुलींच्या वसतिगृहासाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करून दिली. बांधकामासाठी रु.१ हजार १८८.८२ कोटी रूपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेंतर्गत ३ लाख ७९ हजार ३७३ विद्यार्थ्यांना १ हजार २९३ कोटी निर्वाह भत्ता वितरित करण्यात आले आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १७ लाख ५४ हजार ४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी रु.१ हजार २६२ कोटी मंजूर करण्यात आले आहे . छत्रपती राजाराम महाराज सारथी गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी मागील वर्षी ३२ हजार ६३९ विद्यार्थ्यांना रु. ३१ कोटी वितरित करण्यात आले आहेत. तसेच यावर्षी ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना रु.४२ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

मराठा समाजाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी रु.२१ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात प्रथमच ह्या योजनाचा लाभ मराठा समाजाच्या विद्यार्थाना मिळणार आहे.

मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या स्वाधार योजनेच्या धर्तीवर निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे . प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष ६० हजार महानगराच्या ठिकाणी, रु.५१ हजार विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी, रु.४३ हजार जिल्ह्याच्या ठिकाणी आणि रु.३८ हजार तालुक्याच्या ठिकाणी निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे वितरीत करण्यात येणार आहे.

मराठा आरक्षण कायदा सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविल्यामुळे शासकीय सेवेत निवड होऊन नियुक्ती न मिळालेल्या १ हजार ५५३ उमेदवारांची अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

विविध न्यायालयीन प्रकरणात कोविड-१९ मुळे नोकरभरती प्रक्रिया रखडलेल्या उमेदवारांसाठी धोरणात्मक निर्णय घेऊन एम. पी. एस. सी. व अन्य शासकीय सेवेत ३ हजार २०० उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या. एस. ई. बी. सी. मधून इ. डब्ल्यू. एस. व खुल्या प्रवर्गाचा विकल्प देऊन उमेदवारांना नियुक्त्या देण्याचा ऐतिहासिक निर्णय, अशा प्रकारे एकूण ४ हजार ७०० उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली.

सारथी कडून मागील तीन वर्षात प्रशिक्षण घेतलेल्या ५८ विद्यार्थ्यांची यू. पी. एस. सी. (१२ आय. ए. एस., १८ आय. पी. एस., ८ आय. आर. एस., १ आय. एफ. एस., २ भारतीय वन सेवा, ५ सी. ए. पी. एफ. व इतर सेवा १२) तर ३०४ विद्यार्थ्यांची एम. पी. एस. सी. मार्फत निवड झाली आहे. सारथी संस्थेमार्फत अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत (पी. एच. डी. करीता) मराठा समाजाच्या २ हजार १०९ विद्यार्थ्यांना रु.११६.३४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहे.इ. डब्ल्यू. एस. अंतर्गत १० टक्के आरक्षणातून विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये ३१ हजार विद्यार्थ्यांपैकी ७८ टक्के मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश. तसेच एम. पी. एस. सी. मार्फत शासकीय सेवेत ६५० उमेदवारांपैकी ८५ टक्के मराठा समाजाच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सारथीमार्फत ३६ हजार ७२६ विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विविध योजना राबवताना त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही याबाबत सातत्याने आढावा घेत असतात त्यामुळे विविध योजनांच्या अंमलबजावणीत गती निर्माण झाली आहे.

**विधिमंडळाचे विशेष अधिवेशन**

कायद्याच्या चौकटीत टिकणारे व इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजास आरक्षण देण्याच्या दृष्टिने चर्चा करण्यासाठी दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे.

**मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठीचा सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सुपूर्द**

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला आहे.

**विक्रमी वेळेत, अहोरात्र काम करून सर्वेक्षण पूर्ण केल्याबद्धल कौतुक**

मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून राज्यात युद्धपातळीवर मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण २ फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आले. राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. याकामी गोखले इन्स्टिट्यूट, आयआयपीएस या नामांकित संस्थेची मदत झाली. विशेष अशा सॉफ्टवेअर प्रणालीच्या माध्यमातून हे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

**कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही**

मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य शासनाने मागासवर्ग आयोगाला सांगितले होते. साडेतीन ते चार लाख लोक यासाठी दिवसरात्र काम करीत होते. सादर करण्यात आलेला अहवाल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येऊन त्यावर चर्चा होईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.

**-राजू धोत्रे**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय मुंबई-३२

# वैजापूरात रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा उत्तम प्रतिसाद






वैजापूर, दि. १६ (प्रतिनिधी) - नागेबाबा मल्टिस्टेट शाखा वैजापूर नेहमीच समाजोपयोगी सामाजिक उपक्रम आयोजित करून सामाजिक बांधिलकी जपत आलेली आहे. याचाच एक भाग म्हणून शुक्रवार (ता.१६) रोजी या शाखेच्या वतिने त्यांचे सहकारी स्व.शिवानंद भाऊसाहेब निंबाळकर यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त त्यांच्या कार्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते,या शिबिरात शहरातील व ग्रामीण भागातील जवानांनी उत्तम प्रतिसाद देऊन 'रक्तदान श्रेष्ठ दान केले' शिबिरात प्रथम स्व,निंबाळकर यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करून सामाजिक कार्यकर्ते व स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले,प्रथम कमांडो चंद्रकांत त्रिभुवन, दत्तात्रय कुलथे,व मंगेश खैरमोडे यांनी रक्तदान करून आरंभ केला. राजपूत यांनी रक्तदानाचे महत्व विशद करीत रक्तदान काळाची गरज असल्याचे नमूद करत नागेबाबा च्या या सामाजिक उपक्रमाला धन्यवाद दिले. शाखेचे प्रमुख डी.एस. सातपुते, सतीश धाडबळे, अजय जांभुळकर, मयूर साळवे सागर साळुंके यांनी पुढाकार घेऊन सहभाग नोंदविला. कोपरगाव येथील संजीवनी ब्लड बँकचे डॉ. नीता पाटील, डॉ. सोनिया रणदिवे, टेक्निशियन रेणुका औटी, विराज गायकवाड, ऋतुजा लोंढे, पी.आर.ओ. सुनील सिरसाट, सनी कांबळे, सनी धिवर यांनी रक्त संकलन केले. या प्रसंगी राजू मेढे, श्री. नेहे यांच्यासह चांद्रकांत त्रिभुवन यांची उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी व्हावी

**हिंदवी** स्वराज्य संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज हे जनतेचे 'जाणते राजे' म्हणून मानतात, लोककल्याणकारी व प्रजाहितदक्ष राजे म्हणून संबोधल्या जातात, अशा दूरदृष्टीचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त विविध सामाजिक, धार्मिक, व लोकोपयोगी तसेच पर्यावरण पूरक उपक्रमानी जयंती साजरी झाली तर ही जयंती व हे उपक्रम चिरकाल स्मरणात राहून समाजहित, व जनहीत साधल्या जाईल असे वाटते,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर व्याख्यान,या निमित्त विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा,वृक्षारोपण, स्वछता उपक्रम,थेंब,थेंब पाणी बचत प्रबोधन,सर्वांना शिक्षण, बालमजुरी निर्मूलन,' बेटी बचाओ- बेटी पढाओ'बाबत जागृती, वृद्ध माता-पिता सेवा, रक्तदान, आरोग्य तपासणी इत्यादी उपक्रम राबवावे असे सुचवावे वाटते. डीजे लावून नाचणे याने ध्वनी प्रदूषण, डीजे आवाजाने हृदय विकार, डीजेच्या प्रखर प्रकाशाने डोळ्यांचे आजार, ही आपत्ती होय, फटाके फोडणे यानेही प्रदूषण व अस्वच्छता, असे समाज विघातक प्रश्न उद्भवतात यासाठी शिवाजी महाराज यांना डोक्यात घेण्यासाठी नाचून नव्हे तर वाचून व विविध विधायक उपक्रम राबवून डोक्यात घेणे योग्य वाटते.

**- धोंडीरामसिंह राजपूत**
वैजापूर जि. औरंगाबाद

# चक्क उपमुख्यमंत्र्यांचे बनावट लेटरहेड आणि सही वापरत दिले अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) - राज्यात सायबर गुन्ह्यांच्या प्रमाणामध्ये वाढ झाली असून आता चक्क राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बनावट लेटरहेड, सही आणि ईमेल बनवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. गृह विभागाकडून अधिकृत परिपत्रक जारी करत याबाबत माहिती देण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांच्या बदली आदेशासाठी उपमुख्यमंत्र्यांचे बनावट लेटरहेड आणि बनावट सहीचाही वापर करण्यात आला आहे. यानंतर तात्काळ कारवाई करत राज्य सरकारने सर्व विभागांना अधिकृत ईमेल वापरणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे आता शासकीय विभागांना जीमेल आणि इतर खासगी मेलचा वापर करता येणार नाही, अशी माहिती गृह विभागाने दिली आहे.

**काय म्हटलं आहे परिपत्रकात?**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या खाजगी सचिवांचे बनावट ईमेल खाते तयार करण्यात आले. या ईमेल खात्याद्वारे, विद्युत विभागाशी संबंधित सहा अभियंत्यांच्या बनावट बदलीचे आदेश विद्युत विभागाला ईमेल करण्यात आले. या बनावट लेटरहेडवर बनावट स्वाक्षऱ्यादेखील असल्याचे निदर्शनास आले आहे. याचे गांभीर्य लक्षात घेऊन भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये मार्गदर्शक सूचनांचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निर्दशनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**परिपत्रकातील सूचना पुढीलप्रमाणे :**

शासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी एकमेकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी आणि इतर व्यवहारासाठी नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (NIC) द्वारे अधिकृत केलेल्या gov.in/ nic.in या डोमेन नेमचा (Domain name) वापर केलेल्या ई-मेलचा शासकीय कामकाजासाठी वापर करणे बंधनकारक करण्यात येत आहे. अधिकृत संप्रेषणासाठी ई-ऑफिस आणि तत्सम स्थापित सरकारी प्लॅटफॉर्मचा वापर करण्यात यावा. Gmail, Yahoo इ. सारख्या खाजगी सेवा प्रदात्यांकडून ईमेल आयडीद्वारे प्राप्त झालेले कोणतेही शासकीय कामकाजासंबंधित माहिती अधिकृत मानली जाणार नाही. सबब, सदर खाजगी सेवा प्रदात्यांचा वापर शासकीय कामकाजासाठी प्रतिबंधित करण्यात यावा. याबाबींची सर्व शासकीय विभागांनी आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी काटेकोर अंमलबजावणी करावी. जेणेकरून उपरोक्त उदाहरणात नमूद केल्याप्रमाणे घटना टाळता येतील. सदर मार्गदर्शक सूचना या सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निर्देशनास आणण्यात याव्या. त्याची काटेकोर अंमलबजावणी होत आहे. याची दक्षता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी घेण्यात यावी, असा सूचना गृह विभागाने जारी केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आल्या आहेत.

# स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अधिवेशन १७-१८ फेब्रुवारी रोजी नागपूर येथे

नागपूर, दि. १६ (प्रतिनिधी) - स्वतंत्र मजदूर युनियन या देशव्यापी कामगार संघटनेचे राष्ट्रीय अधिवेशन १७-१८ फेब्रुवारी २०२४ रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग,नागपूर येथे राष्ट्रीय अध्यक्ष जे.एस.पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे.या अधिवेशनाचे उद्घाटन प्रसिद्ध विचारवंत कांचा इलैय्या,हैद्राबाद यांचे हस्ते होणार असून प्रसिद्ध अधिवक्ता असिम सरोदे,पुणे,मंडल आयोगाचे अध्यक्ष बी.पी.मंडल यांचे नातू डॉ.सूरज मंडल,नवी दिल्ली,पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता महेन्द्र यादव, भोपाळ, असंघटीत कामगारांचे नेते डी.सी. कपिल, नवी दिल्ली, कायदेतज्ञ डॉ. दिनेश गौतम, झांसी, संपादक व लेखक डॉ.सिद्धार्थ, गोरखपूर हे वेगवेगळ्या विषयांवर आपले विचार व्यक्त करतील. स्वतंत्र मजदूर युनियन ही फुले-शाहू-आंबेडकर व पेरियारवादी विचारांची कामगार संघटना देशातील बहुतेक राज्यात कार्यरत असून विविध उद्योगातील ४६ संघटना या देशव्यापी युनियन सोबत संलग्न आहेत. संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या या संघटनेच्या सदर अधिवेशनामध्ये देशातील कामगारांचे प्रश्न, किमान वेतन, कंत्राटी कामगारांचे प्रश्न, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न,जुनी पेन्शन योजना, कामगारांचे संविधानिक हक्क व अधिकार, पदोन्नतीमधिल आरक्षण, या विषयांवर सखोल चर्चा करून ठराव मांडण्यात येतील असे राष्ट्रीय उपाध्यक्ष नरेंद्र जारोंडे यांनी कळविले आहे.

दुसऱ्या दिवशी १८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.के.पी. स्वामिनाथन यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या प्रतिनिधी सत्रात स्वतंत्र मजदूर युनियनशी संलग्न असलेल्या देश व विविध राज्य पातळीवरील संघटनांचे पदाधिकारी कामगारांच्या समस्या मांडून देशपातळीवर आंबेडकरी कामगार विचार मजबूत करण्यासह स्वतंत्र मजदूर युनियनला केंद्र सरकारतर्फे सर्व पातळ्यांवर प्रतिनिधीत्व मिळण्यासह इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनवर प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी आराखडा प्रस्तुत करतील. याप्रसंगी मंजूर झालेले ठराव केंद्र शासनाकडे सादर केले जातील. या राष्ट्रीय अधिवेशनात केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान, दिल्ली, बिहार, पश्चिम बंगाल यासह महाराष्ट्रातील विविध संलग्न संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचीही माहिती नरेंद्र जारोंडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविली आहे.

## डॉ. अभय मंडलिक यांची खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकपदी निवड

खामगाव, दि. १६ (प्रतिनिधी) - दि खामगाव अर्बन को-ऑपरेटिव



बँकेची सन २०२४ ते २९ या कालावधीसाठीची संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. एकूण १८ संचालकांपैकी १४ संचालकांची बिनविरोध निवड झाली.

दि खामगाव अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड खामगाव ही बँक मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँक असून मागील पन्नास वर्षापासून ४१ शाखांमार्फत या बँकेचा व्यवहार सुरू आहे.

बुलढाणा जिल्ह्याबाहेरील मतदार संघात चार सदस्यांसाठी निवडणूक झाली. त्यात डॉ. अभय मंडलिक यांना सर्वाधिक मते पडून ते निवडून आले. श्री मंडलिक हे देवगिरी नागरी सहकारी बँक छत्रपती संभाजी नगरचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी असून बँकिंग क्षेत्रात त्यांचा चार दशकांपेक्षा अधिक काळाचा अनुभव आहे. बँकिंग या विषयावर त्यांनी सात पुस्तके लिहिलेली असून या विषयावर वृत्तपत्र, नियतकालिके यातून ते नियमितपणे लिखाण करतात.

## मनपात संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यालय येथे मा. अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, संतोष कोठाळे आदी कर्मचारी यांची उपस्थिती होती.**

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पितृशोक

छत्रपती संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) - विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पितृशोक झाला आहे. त्यांचे



वडील एकनाथराव आनंदराव दानवे यांचे आज शुक्रवार वेळ १.३५ वाजता सभाजीनगर येथील ओरिअन सिटी केअर हॉस्पिटल मध्ये निधन झाले. ते ८२ वर्षाचे आहे. मागील एक महिन्यापासून ते रुग्णालयात उपाचार घेत होते, त्यांना मुत्रुपिंडाचा कर्करोग झाला होता.. मागील बऱ्याच वर्षांपासून ते या आजाराने ग्रसित होते. त्याच्यावर दोन सर्जरी उपचारादरम्यान करण्यात आल्या होत्या. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात चालक म्हणून ३५ वर्ष सेवा दिली आहे. अंत्ययात्रा सायंकाळी ५.०० वा अजबनगर, संभाजीनगर येथून काढण्यात आली. यावेळी राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नातेवाईकांनी हाक दिली आणि सरणावर असलेल्या महिलेने प्रतिसाद दिला

भुवनेश्वर, दि. १६ (वृत्तसंस्था) - ओडिशामधून एक आश्चर्यकारक घटना समोर आली आहे. एक महिला आगीत भाजल्याने तिचा श्वासोच्छवास काही काळासाठी बंद पडला होता. ती मृत झाल्याचे समजून तिच्या नातेवाईकांनी तिला स्मशानभूमीत नेले. मात्र, चिता जाळणार इतक्यात त्या महिलेने डोळे उघडले आणि उपस्थित सर्वजण आश्चर्यचकित झाले. गंजममधील बेरहामपूरमध्ये घडलेल्या या घटनेची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे.

गुड्स शेड रोड परिसरात राहणाऱ्या महिलेच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या घराला १ फेब्रुवारीला आग लागली. त्यात महिला ५० टक्के भाजली. तिला तातडीने एमकेजीसी वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथल्या डॉक्टरांनी महिलेला दुसऱ्या रुग्णालयात रेफर केलं. पण उपचारांसाठी पुरेसे पैसे नसल्यानं महिलेचा पती तिला घरी घेऊन आला.

महिलेला घरी आणण्यात आलं तेव्हा तिची मृत्यूशी झुंज सुरू होती. सोमवारी तिने डोळे उघडले नाहीत. महिला श्वास घेत नसल्याचं नातेवाईकांच्या लक्षात आलं. त्यामुळे तिचा मृत्यू झाला असावा असा कुटुंबाचा समज झाला. कुटुंबियांनी शेजाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर डॉक्टरांचा सल्ला न घेता, मृत्यू प्रमाणपत्र न घेता कुटुंबियांनी महिलेचा मृतदेह बिजीपूर स्मशानभूमीत नेला.

अंत्यविधींची तयारी सुरू करण्यात आली. चिता रचण्यात आली. त्यावर पार्थिव ठेवण्यात आलं. तितक्यात महिलेनं अचानक डोळे उघडले. त्यामुळे सगळेच चकित झाले. उपस्थितांनी महिलेला साद घातली. तिने प्रतिसाद दिला. त्यामुळे तिथे हजर असलेल्या सगळ्यांना चमत्कार पाहायला मिळाला. घटनेची माहिती स्थानिक नगरसेवकाला देण्यात आली. महिलेला शववाहिकेतून स्मशानभूमीत आणण्यात आलं होतं. त्याच वाहनातून तिला पुन्हा घरी नेण्यात आलं. यानंतर महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सध्या तिच्यावर उपचार सुरू आहेत.

# राजकीय पक्षांच्या निधीचा स्त्रोत जाणने देशातील जनतेचा हक्क

नवी दिल्ली, दि. १६ (वृत्तसंस्था) - लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या निर्णयाने सर्वच राजकीय पक्षांना मोठा धक्का बसला आहे.

राजकीय पक्षांना मिळणारा निधी, देणग्या आणि पैशांचा स्त्रोत जाणून घेण्याचा देशातील जनतेला हक्क आहे. त्यामुळे निवडणूक रोखे योजना प्रणाली ही माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे ती असंवैधानीक ठरते, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने इलेक्टोरल बॉन्ड योजना रद्द ठरवली आहे.

सर्वोच्च न्यायालय एवढ्यावरच थांबले नाही तर, या योजनेंतर्गत पाठिमागील पाच वर्षांमध्ये जमा केलेल्या निधीचा हिशोबही कोर्टाने मागितला आहे. तसेच, स्टेट बँक ऑफ इंडियाने त्याबाबतची माहिती आपल्या संकेतस्थळावर (वेबसाईट) नागरिकांना उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशही दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे पाच न्यायाधीश सीजी डाय चंद्रचुड आणि न्यायमूर्ती संजीव खन्ना, बीआर गावाई, जेबी पारडिवला आणि मनोज मिस्त्रा यांच्या घटनापीठने हा निर्णय आज (१५ फेब्रुवारी) जाहीर केला. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय उद्योजक आणि राजकीय पक्षांना हाताला धरुन नानाविध उद्योग करणाऱ्या अनेकांना धक्का असल्याचे मानले जात आहे. घटनापीठाने आपल्या निर्णयात निवडणूक रोखे हा माहिती अधिकार कायदा अनुच्छेद १९(१)(ए) अन्वये कायदेशीर उल्लंघन मानले आहे. कोर्टाच्या या निर्णयामुळे देशातील सामन्य नागरिकांना राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या, निधी आणि पैशांचा स्त्रोत जाणून घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्र सरकारच्या निवडणूक रोखे योजनेला चार याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. निवडणूक रोखे योजना ही राजकीय पक्षांना दिलेल्या देणगीबाबत गुप्तता बाळगण्याशी संबंधीत आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने ही योजना आणली होती. या योजनेंतर्गत राजकीय पक्षांना दिल्या जाणाऱ्या देणगीदारांची नावे गुप्त ठेवता येणार होती. राजकीय पक्षांच्या देणग्या माहिती अधिकारातून वगळण्यात आल्याने त्याबाबत देशातील जनतेला जाणून घेण्याचा अधिकार नव्हता. याबातब न्यायालयात आव्हान दिले गेल्यानंतर पाच सदस्यांचे घटनापीठ स्थापन करण्यात आले. अनेक सुनावण्या पार पडल्यानंतर २ नोव्हेंबर २०२३ रोजी कोर्टाने सुनावणी पूर्ण करुन निर्णय राखून ठेवला होता. जो आज जाहीर करण्यात आला.

# पार्टटाइम जॉबचे आमिष सायबर भामट्याच्या शोधात पोलीस

नवी दिल्ली, दि. १६ (वृत्तसंस्था) - लिंकमध्ये अनेक हॉटेल्सची माहिती होती आणि त्याला रेटिंग देण्यास सांगण्यात आले होते. रेटिंग दिल्यानंतर त्याचा स्क्रीनशॉट घेऊन त्याच व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर परत पाठवण्यास सांगण्यात आले होते. 'स्टॉल मालकाने सूचनांचे तंतोतंत पालन केले आणि हॉटेलला रेटिंग दिल्यावर आणि त्याच नंबरवर त्याचा स्क्रीनशॉट पाठवल्यानंतर सुरुवातीला त्याला १५० रुपये मिळाले. त्यानंतर तो इतर हॉटेलांना रेटिंग देत होता. त्या बदल्यात त्याला दीडशे रुपयांपासून दोन हजार ८०० रुपये मिळाले.

स्टॉल मालकाला एका टेलिग्राम ग्रुपमध्ये जोडण्यात आले होते. या ठिकाणी संशयित अनोळख्या व्यक्तींकडून त्याला प्री-पेड कामांमध्ये पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले आणि प्रतिदिन तीन हजार रुपये ते चार हजार रुपये नफा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले होते. स्टॉल मालकाने अवघ्या पाच दिवसांत टेलिग्रामवर सांगितलेल्या चार वेगवेगळ्या बँक खाते क्रमांकावर ११ लाख रुपये ट्रान्सफर केले. एवढी मोठी रक्कम गुंतवणूक करूनही पुढील दोन-तीन दिवसांत नफा मिळू शकला नाही, तेव्हा स्टॉल मालकाला संशय आला. त्याने चौकशी करण्यास सुरूवात केली. पैसे परत मिळविण्यासाठी त्याला आणखी पैसे गुंतवण्यास सांगितले होते; परंतु कोणतेही समाधानकारक उत्तर किंवा पैसे मिळाले नाहीत म्हणून त्याचा संशय अधिक बळावला आणि त्याने पोलिसांकडे धाव घेतली. रितसर तक्रार नोंदविण्यात आली. सहपोलीस आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम यांच्या देखरेखीखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक देवराज बोरसे यांच्या नेतृत्वाखालील एक पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. जास्त नफ्याचे आमिष दाखवून ११ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या त्या सायबर फसवणूक करणाऱ्या भामट्याचा पोलीस शोध घेत आहेत.

सध्या ऑनलाइनचा जमाना आहे; परंतु काळजी घेतली नाही, तर मोठा फटका बसू शकतो, हे विसरून चालणार नाही. सायबर भामटे विविध माध्यमांतून फसवणूक करण्याचे काम करत आहेत. यासंदर्भात गुन्हे वाढत असताना अटक झालेल्यांची संख्या मात्र नगण्य आहे. कधी 'वर्क फ्रॉम होम' देत असल्याचे आमिष देत फसवणूक होते केव्हा पार्टटाइम जॉबच्या नावावर फसवले जाते. मुंबईत नव्हे, तर महाराष्ट्रात असे अनेक गुन्हे घडत आहे. त्यामुळे आमिषाला बळी न पडता सायबर ठगांपासून जनतेने सावध असायला हवे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणूका घ्या

## रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शन



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- देशाबरोबरच राज्यातही गुंडागर्दी प्रचंड वाढली आहे. यात बेछूट गोळीबार करून जीवे मारण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अपयश् असून त्यांनी राजीनामा द्यावा. तसेच हुकुमशाही थांबवून लोकशाही जीवंत ठेवायची असेल, तर ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणूक घ्याव्यात, या प्रमुख मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने शुक्रवारी दुपारी १ ते २ वाजेच्या सुमारास जोरदार निदर्शने आंदोलन करण्यात आले.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रसह देशभर काही जातीयवादी संघटना, पक्ष ईव्हीएम ओटिंग मशीनचा गैरवापर करून निवडून येत आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. मनमानी कारभार, हुकुमशाही नांदू लागली आहे.

यामुळे देशभरातील सर्वसामान्य जनता, नोकरदार, सर्वच हैराण झाले आहेत. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली, त्याकडे कुणी लक्ष देत नाहीत. सर्वात भीषण समस्या म्हणजे अन्याय अत्याचार वाढले आहेत. दिवसा ढवळ्या बलात्कार होत आहेत, मुडदे पाडले जात आहेत. कायद्याचा धाकच उरला नाही. परिणामी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. हे गृहमंत्री फडणवीसांचे अपयश असून त्यांनी थोडी जरी नैतिकता शिल्लक असेल तर तात्काळ राजीनामा द्यावा, दुसरे ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवरच निवडणूका घ्याव्यात, समाजकल्याणचा निधी इतरत्र न वळवता दलित वस्तीमध्येच खर्च करावा, घरकुल बांधण्यासाठी वाढीव निधी मिळावा, जोगेश्वरी ग्रामपंचायत हद्दीतील आंबेडकर नगरात नवीन रेशन दुकान मिळावे, कैलास साळवे खून प्रकरण फास्ट ट्रॅक खटला चालवावा, दोषींना फाशी व्हावी, कुटुंबियांना २५ लाख रूपये आर्थिक मदत मिळावी, यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. पश्चिम जिल्हाध्यक्ष काकसाहेब गायकवाड, बबन साठे, राहुल कानेड, विनोद वाकोडे, संतोष जाधव आदी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी आंदोलनात सहभाग घेतला.

# पल्स पोलिओ लसीकरण मोहिम

## जिल्ह्यातील ३ लाख १४ हजार बालकांना दि. ३ मार्च रोजी डोस देण्याची सज्जता

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील शून्य ते ५ वर्षे वयोगटातील ३ लाख १४ हजार ६५० बालकांना येत्या रविवार दि.३ मार्च रोजी डोस देण्याची सज्जता आरोग्य यंत्रणेने केली आहे. जिल्हा कृती दल समितीच्या दि.१४ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी यासंदर्भात आढावा घेतला.

पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकरी डॉ. संजय मुळे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बढे, डॉ. नागेश आवरगावकर, डॉ. शेख शकील अहेमद, डॉ. उज्ज्वला भामरे, डॉ. अर्चना राणे, डॉ. .आर. राणावत तसेच अन्य संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पल्स पोलिओ लसीकरण मोहिम रविवार दि.३ मार्च रोजी राबविण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ९ तालुके व १३०० गावे, वाड्या, वस्त्या, तांडे येथे २२०७ लसीकरण बुथ तयार करण्यात आले आहेत. १९२१ पथके काम करणार असून त्यावर ४५८ निरीक्षक असतील. १२६ फिरते पथक असून ८९ बदली पथके असतील. १५३ वैद्ययकिय अधिकारी व जिल्हास्तरीय ९ अधिकारी या लसीकरणासाठी कार्यरत राहणार आहेत,अशी माहिती देण्यात आली.

# अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. या योजनेसंदर्भात दि.७ जुलै २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित झाला असून त्याद्वारे केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरिता जारी केलेल्या सुधारित मार्गसूचना राज्यात लागू करण्यात येणार असल्याची माहिती प्रादेशिक उपायुक्त श्रीमती जयश्री सोनकवडे यांनी दिली आहे.

राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल अंतर्गत ही योजना राबविण्यात येते. योजनेचा लाभ हा Direct benefit transfer (डीबीटी) द्वारे देण्यात येणार असल्याने लाभार्थ्यांच्या अर्जाचे नूतनीकरण करण्याकरिता आधार क्रमांक असणे व ते त्याच्या बँक खात्यास जोडलेले असणे आवश्यक आहे. ही जबाबदारी संपूर्णतः विद्यार्थ्यांची असून त्यांनी त्यांचे बँक खाते, दूरध्वनी क्रमांक, आधारकार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे. प्रतिवर्षाच्या शिष्यवृत्तीच्या अर्जाचे नूतनीकरण करण्याकरिता विद्यार्थ्यांचा मागील वर्षाचा समाधानकारक प्रगती अहवाल व मागील वर्षाची किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज अद्यापही सादर न केलेल्या विद्यार्थ्यांनी तात्काळ अर्ज सादर करावेत.

तसेच या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी या जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून फॉर्म भरून घेण्याची कार्यवाही करावी व तसेच महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना सादर करावे, असे आवाहन श्रीमती जयश्री सोनकवडे यांनी केले आहे.

# पुरुषोत्तमराव उत्तमकाका जहागिरदार यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- मोठी लाठी जि.नांदेड येथील श्री.पुरुषोत्तमराव उत्तमकाका ज़हागिरदार वय वर्ष ८३ यांचे आज सकाळी १०.३० वाजता संभाजीनगर येथे - हदयविकारामुळे दुःखद निधन झाले.

त्यांच्या मागे चार मुली जावाई नातवंडे असा परिवार आहे. अंत्ययात्रा प्राईड रेसिडेन्सी ज्योतीनगर येथून निघून अंत्यसंस्कार रात्री ९.३० वाजता प्रतापनगर स्मशानभूमीत करण्यात आले.

# ‘बँक मित्र’ आर्थिक विकासाचे आधार-डॉ.भागवत कराड



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- गोरगरिब, दुर्गम-ग्रामिण भागातील लोकांपर्यंत बँकांच्या विविध सेवा पोहोचवून त्यांचे आर्थिक समावेशन करणारे बँक मित्र हे आर्थिक विकासाचे आधार आहेत,असे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज येथे केले.

जिल्ह्यातील बँक मित्रांशी आज ते संवाद साधत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित बैठकीस कॅनरा बँकेचे क्षेत्रिय प्रबंधक बिनय कुमार, जिल्हा अग्रणी बँकेचे मिलिंद केदारे, महाराष्ट्र ग्रामिण बँकेचे गणेश कुलकर्णी, देवगिरी बँकेचे किशोर शितोळे, संजय खंबाते तसेच विविध बँकांचे क्षेत्रीय अधिकारी आदी उपस्थित होते.

डॉ. कराड म्हणाले की, देशातील गोरगरिब हा बँकांशी जोडला जावा यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विविध योजना सुरु करुन त्यांना बँक खाते सुरु करण्याची सुविधा दिली. जनधन योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून लोकांना बँकांशी जोडण्यात आले. त्यातून मोठ्या प्रमाणावर लाभ झाला. देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याचे स्वपन साकारत असतांना ग्रामिण भागात आर्थिक साक्षरताही आली पाहिजे असा यामागे दृष्टिकोन आहे. हे सगळे प्रयत्न बँक मित्रांमुळेच यशस्वी होत आहेत,असे त्यांनी सांगितले. बँक मित्रांचे कमिशन वाढले पाहिजे व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठीही आपण प्रयत्न करु असे आश्वासनही त्यांनी उपस्थितांना दिले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँक मित्रांना डॉ. कराड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# कारागृह राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाचा डंका; सुनिल विठ्ठल काकरवाल यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू

पुणे दि.१६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र कारागृह राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाने २०२३-२४ या वर्षाचे विजेतेपद पटकावले आहे. तसेच सर्वोत्कृष्ट पुरूष खेळाडू म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागाचे सुनिल विठ्ठल काकरवाल तर सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून नाशिक विभागाच्या अनिता कैलास वाकचौरे यांची निवड करण्यात आली. विजेत्यांना ट्रॉफी व रोख रुपये २१ हजार पारितोषिक देण्यात आले.

महाराष्ट्र कारागृह विभाग राज्यस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा शुक्रवारी येरवडा येथील दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय पार पडला. गृहरक्षक दलाचे महासमादेशक रितेश कुमार, कारागृह विभागाचे प्रमुख अतिरिक्त पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता, कारागृह उपमहानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर यांच्या उपस्थितीत विजेत्यांना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले आहे. यावेळी कारागृह उपमहानिरीक्षक (पुणे विभाग) स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक (मुंबई विभाग) योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक (छत्रपती संभाजीनगर) यु.टी.पवार, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय प्राचार्य नितीन वायचळ, येरवडा मध्यवर्ती कारागृह अधीक्षक सुनिल ढमाळ तसेच इतर मध्यवर्ती व जिल्हा कारागृहांचे अधीक्षक, सर्व अधिकारी, कर्मचारी आणि खेळाडू उपस्थित होते.

महाराष्ट्र कारागृह विभागामार्फत कारागृहातील ‘अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी राज्यस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. महाराष्ट्र कारागृह विभागाचे एकूण पाच विभाग असून विभागीय स्तरावरून विभागीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

(पान १ वरुन)

## भास्कर जाधव...

बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातील एक किस्सा सांगितला. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी राणे साहेबांना बोलावून घेतलं. ते म्हणाले की, ’नारायण आपल्याला काँग्रेसचे सरकार पाडलं पाहिजे’. तेव्हा राणे साहेबांनी बाळासाहेबांना शब्द दिला, यावेळी आपण सरकार पाडण्याचा प्रयत्न करु. तेव्हा राणे साहेबांकडे पैसे नव्हते, केवळ कार्यकर्त्यांची फौज होती. त्यांनी शिवसेनेच्या सगळ्या आमदारांना गोरेगावाच्या मातोश्रीच्या क्लबमध्ये नेले. त्यावेळी पैसे नव्हते म्हणून राणे साहेबांनी घर गहाण ठेवले. पण त्यांनी कधीही बाळासाहेबांकडे पैसे मागितले नाहीत. महाराष्ट्राच्या राजकारणात दुसऱ्यांदा उभा राहणारा एकमेव नेता म्हणजे नारायण राणे आहेत, असे निलेश राणे यांनी म्हटले.


## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(मालमत्ता विभाग)

जा.क्र./मनपा/मामअ/१५३०/२०२४ दिनांक :- १६/०२/२०२४

### ई-निविदा सुचना

### सन २०२३-२४ फेर निविदा (दुसरी वेळ)

सदर निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होईल.

| अ. क्र. | मिळकतीचे विवरण | वार्षिक आधारभूत रक्कम | इसारा रक्कम | एक वर्षाची अनामत रक्कम | निविदा पत्रक रक्कम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | हर्सुल तलाव मत्स्य व्यवसाय | रु.१८,४५,२८१/- | रु.१८,४५३/- | रु.१८,४५,२८१/- | रु.६००/- | ३ वर्ष |

**निविदेसोबत जोडायचे आवश्यक कागदपत्रे :-**

१. स्थायी पत्ता साक्षांकित प्रत, पॅनकार्ड, आधारकार्डची प्रत द्यावी.
२. संस्था असल्यास संस्थेचे पॅनकार्ड व नोंदणी प्रमाणपत्राची प्रत द्यावी.
३. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी भरणा केलेली पावती अथवा महानगरपालिका हद्दीत मालमत्ता नसल्यास त्या बाबत सक्षम साक्षांकित प्रतिज्ञापत्र इत्यादी देणे आवश्यक आहे.
४. राहण्याचा पत्ता यासाठी आधार किंवा निवडणूक ओळखपत्र (ॲड्रेस प्रूफची) साक्षांकित प्रत,
५. मागील ०३ वर्षाचे आयकर विभागाचे प्रपत्र असणे बंधनकारक राहील.

**निविदेच्या अटी शर्ती :-**

१. सदर निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होईल.
२. संबंधीत मत्स्य ठेकेदाराने तलावामध्ये कुठलेही हानिकारक रसायन टाकु नये.
३. तलावामध्ये गढुळता वाढल्यास लागणाऱ्या अतिरिक्त रसायनाचा सर्व खर्च संबंधीत मत्स्य व्यवसाय ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.
४. धरणाचे पाणी दुषित झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
५. धरणाची पाणी पातळी भविष्यात ०८ फुट झाल्यास, मत्स्य व्यवसाय बंद करणे बंधनकारक राहील,
६. महानगरपालिकेच्या तलाव स्त्रोतात पाणी येण्यास अडथळा येईल, असे कुठलेही काम संबंधीत ठेकेदारास करता येणार नाही.
७. दरवर्षी ठेका रक्कमेवर १०% नैसर्गिक भाडेवाढ राहील.
८. सदर तलाव हा तात्पुरत्या स्वरुपात मत्स्य व्यवसाय करणेसाठी देणे असत्याने, त्यावरचे नियंत्रण महानगरपालिकेचे राहील,
९. निविदाधारकाने महानगरपालिकेस ठेका रक्कम थकविल्यास, उक्त रक्कम वसूली संबंधाने निविदा धारकांच्या मिळकतीवर आर्थिक बोजाची नोंद घेण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ (क) नुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच अनामत रक्कम जप्त करून निविदा धारकाकडून सदर तलावाचा आहे त्यास्थितीत ताब्यात घेण्यात येईल...
१०. करारानामा मधील कोणत्याही अटी शर्तीचे उल्लघंन केल्याचे महानगरपालिका आयुक्त अथवा महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास या बाबतचा ठेका रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेस असेल व त्यावेळेस निविदा धारकास विना अट ठेका सोडावा लागेल.
११. महानगरपालिकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील.
१२. प्रस्तावित जागे बाबत धर्मदाय आयुक्त किंवा इतर कोठेही निविदा धारकाची मालमत्ता म्हणुन नोंद करता येणार नाही. तसे केल्याचे आढळल्यास, निविदा धारका विरुध्द आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित केली जाईल व त्या बाबतचा सर्व खर्च निविदा धारकाकडून वसूल केला जाईल.
१३. ठेका रककमेवर जी.एस.टी. १८% भाडे रक्कमे व्यतिरिक्त भरणा करावा लागेल,
१४. संबंधीताच्या नावाने निविदा मंजुर झाल्यास अनामत रक्कम भरल्यानंतर व एक वर्षाचे आगाऊ भाडे भरणा केल्यानंतर करारनामा करून त्या नंतरच मत्स्य ठेका संदर्भाने कार्यादेश देण्यात येईल
१५. प्रस्तुत भाडेपट्टा करारनाम्याचा, तसेच नोंदणी करण्याचा सर्व खर्च निविदा धारकास करावा लागेल.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका



## छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका

(मालमत्ता व्यस्थापन विभाग)

जा.क्र./मनपा/मामअ/२०२४/१५२१ दिनांक : १४/०२/२०२४

### जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका जाहीर आवाहन करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी रिक्त असलेल्या खालील नमुद गाळ्यांची निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | व्यापारी संकुलांचे नांव | दुकान क्र. | दुकानाचे क्षेत्रफळ | प्रती महा भाडे (विना GST) | इसारा रक्कम (EMD) | भाडेपट्टा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | ११ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | १२ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ३ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | १७ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ४ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | १८ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ५ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | १९ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ६ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | २३ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ७ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | २४ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ८ | भोलेश्वर मार्केट, व्यापारी संकुल | २५ | ६.३ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ९ | पिया मार्केट (पहिला मजला) | ०९ | ७.२ चौ.मी. | रु.२,०२०/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १० | पिया मार्केट (पहिला मजला) | १८ | ७.२ चौ.मी. | रु.२,०२०/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ११ | पिया मार्केट (पहिला मजला) | २० | ७.२ चौ.मी. | रु.२,०२०/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १२ | पिया मार्केट (पहिला मजला) | २१ | ७.२ चौ.मी. | रु.२,०२०/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १३ | पिया मार्केट (पहिला मजला) | २३ | ७.२ चौ.मी. | रु.२,०२०/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १४ | पिया मार्केट (पहिला मजला) | २७ | ७.२ चौ.मी. | रु.२,०२०/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १५ | नाथ सुपर मार्केट (पहिला मजला) | ०९ | २४.८ चौ.मी. | रु.८,०००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १६ | जय टॉवर, व्यापारी संकुल | ०१ | १०.५ चौ.मी. | रु.३,०००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १७ | जय टॉवर, व्यापारी संकुल | ०२ | १०.५ चौ.मी. | रु.३,०००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १८ | जय टॉवर, व्यापारी संकुल | ०५ | २३.०० चौ.मी. | रु.१२,०००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| १९ | जय टॉवर, व्यापारी संकुल | १२ | १३.७६ चौ.मी. | रु.४,६००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २० | जय टॉवर, व्यापारी संकुल | २० | १५.०६ चौ.मी. | रु.४,६००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २१ | सादीया मार्केट पैठणगेट | A-२४ | १२.३१ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २२ | सादीया मार्केट पैठणगेट | B-१९ | ११.४२ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २३ | सादीया मार्केट पैठणगेट | B-२४ | ११.४२ चौ.मी. | रु.२,५००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २४ | सादीया मार्केट पैठणगेट | S-१६ | ५.७६ चौ.मी. | रु.१,२००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २५ | सादीया मार्केट पैठणगेट | S-१७ | ७.३० चौ.मी. | रु.१,२००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २६ | सादीया मार्केट पैठणगेट | S-१९ | ७.३० चौ.मी. | रु.१,२००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २७ | कबाडीपुरा, व्यापारी संकुल | १५ | २१.५१ चौ.मी. | रु.३,२००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २८ | कबाडीपुरा, व्यापारी संकुल | १६ | १७.४९ चौ.मी. | रु.३,२००/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| २९ | एकनाथ नगर, व्यापारी संकुल | १८ | ४.५६ चौ.मी. | रु.३,५५२/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |
| ३० | एकनाथ नगर, व्यापारी संकुल | २४ | ४.५६ चौ.मी. | रु.३,५५२/- | रु.५,०००/- | ०३ वर्ष |

उपरोक्त जाहीर निविदा भरण्याची मुदत दि. १६/०२/२०२४ ते दि. ०४/०३/२०२४ पर्यंत राहील. सदरील जाहीर निविदा महानगरपालिकेच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. करीता इच्छुक नागरिकांनी निविदेमध्ये सहभाग घ्यावा.

**मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांची मान्यता.**

स्वाक्षरीत/-
सहाय्यक आयुक्त
मालमत्ता व्यवस्थान विभाग
छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका